# X - MARATHI GRAMMAR - (CBSE)
# निबंधलेखन

निबंध (नि+बंध)या शब्दाचा अर्थ बांधणे,गुंफणे, जुळविणे असा आहे.

एखाद्या दिलेल्या विषयावर योग्य व निवडक अशा विचारांची आकर्षक व सुसंगत रीतीने केलेली मांडणी म्हणजचे **निबंध** होय. निबंधलेखनाची थोडक्यात तयारी.

वाचन आवश्यक आहे. आपण पाठयपुस्काशिवाय अवांतर वाचन करायला हवे. अवांतर वाचनात सातत्य हवे. तसेच विविधता हवी. केवळ मनोरंजनासाठी, कथा,छोट्या छोट्या गोष्टी वाचणे पुरेसे नसते. चरित्र, आत्मचरित्र,प्रवासवर्णन, ललित निबंध,लघूकथा, ऐतिहासिक कादंबऱ्या, नाटके, एकांकिका, विचारप्रधान निबंध, असे साहित्य वाचले पाहिजे.

वाचनाबरोबर आपण लिहायला हवे. शाळेत सांगितलेल्या निबंधाशिवाय आपण लिहायला हवे. आपल्या शाळेतील निबंध स्पर्धा, वक्वृत्त्वस्पर्धा, नाटयस्पर्धा, यात भाग घ्यायला हवा. त्यामुळे भाषेचा वापर करण्याच्या संधी मिळतात.

आपले विद्यार्थिजीवन, शालेय जीवन हा एक बहुमोल ठेवा आहे. त्यातील अनुभव आपण डोळसणाने टिपले पाहिजे. आपली शाळा, मित्र, शिक्षक, पुस्तके, क्रिडांगण,ग्रंथालय, चित्रकलावर्ग, प्रयोगशाळा ,या ठिकाणी आपण रमले पाहिजे.

चांगले विचार, सुभाषिते, सुवचने यांचा संग्रह करण्याचा छंद असावा. आपल्या डायरीत त्याची नोंद असावी.

आपण विचार करायला शिकले पाहिजे. आपले विचार, आपल्याला सुचलेल्या कल्पना टिपून ठेवल्या पाहिजे.

## निबंधाचे प्रकार :-

१. वर्णनात्मक निबंध

२. आत्मवृत्तपर निबंध

३. कल्पनात्मक निबंध

## निबंधासाठी गुणदान पद्धती :- (बोर्ड पॅटर्ननुसार गुणांमध्ये बदल होऊ शकतो)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आकर्षक प्रारंभ (प्रस्तावना) | -- | ०१ |
| २) | तर्कसुसंगत व मुद्देसुद आशय | -- | ०२ |
| ३) | भाषाशैली (निबंध प्रकारानुसार) | -- | ०२ |
| ४) | शुद्धलेखन /विरामचिन्हे यांचा बिनचूक उपयोग | -- | ०१ |
| ५) | अक्षरसौंदर्य (सुवाच्च अक्षर) | -- | ०१ |
| ६) | उपसंहार (शेवट परिणामकारक) | -- | ०१ |
| | | **एकुण** | **०८** |

## उत्कृष्ट निबंध लेखनासाठी पुढील बाबी लक्षात ठेवा :-

१) ज्या विषयावर निबंध लिहावयाचा आहे , त्योच पूर्ण आकलन हवे.

२) मांडणी मुद्देसुद असून त्यात विषयाचा विकास व तर्कसुद्धता असावी.

३) भाषेत सहजता असावी.

४) वैचारिक स्पष्टतेबरोबर आकर्षक सुरुवात व शेवट ठाम असावा.

५. शब्द, वाक्य, सुभाषिते, विधाने यांचा योग्य वापर असावा.

६. शैली सहजसुंदर व ओघवती असावी.

**प्रश्न :- मुद्यांवरुन १५० ते २०० शब्दांत निबधं लिहिणे. :-**

## आत्मवृत्तपर निबंध

### १) मी सिंहगड बोलतोय. . . . .

**मुद्दे :-** (शिवकाळात कोंढाणा हे नाव - गड आला, पण सिंह गेला- इतिहासाचा शिलेदार - १५ व्या शतकापासूनच्या घटनेचा साक्षीदार -इतिहास विसरु नका- विचार करा- वारसा जतन करा.जय शिवाजी.)

मी 'कोंढाणा ! कोंढणा म्हटल्यावर गडबलात ! अहो, शिवाजी महाराजांच्या काळात माझे नाव कोंढाणा असेच होते. मी मुघलांच्या ताब्यात होतो. शिवबांनी मला जिंकण्यासाठी तानाजी सारख्या शूर मावळयाला पाठविले. खरे तर तेव्हा तानाजीच्या मुलाचे लग्न होते. घरात शुभकार्य असतानरा शिवबांसाठी तानाजी गड जिंकण्याच्या ईर्ष्येने मोहिमेवर निघाला. किल्ला चढून जाणे म्हणजे शत्रूला सावध करण्सारखे होते; म्हणून तो शूर मावळा घोरपडीवरुन गड चढून आला. अजूनही आठवतेय मला, त्याचे ते शौर्य, त्याची ती स्वामीनिष्ठा ! त्याची ती कर्तव्यनिष्ठा आठवली, की अजून अंगावर रोमांचे उभे

राहतात. अशा क्षात्रधर्माचे तेजस्वी स्फुल्लिंग असलेल्या तानाजीसारख्या शुरवीराचे बलिदान आठवते. तो धगधगता ज्वलंत इतिहास शक्य आहे का विसरणे?

' गड आला, पण सिंह गेला' हे शिवबांचे उद्गार अजूनही कानांत घुमतात. तेव्हापासून मी कोंढाण्याचा सिंहगड झ ाालो. शिवबांचय मावळयांच्या त्यागाच्या रक्ताने माखलेले माझे शरीर पावन झाले. वीरश्रीने ओतप्रोत भरलेल्या थोर क्रांतिपर्वाचा विसर पडणे शक्त आहे का ? माझ्या प्रत्येक अणू-रेणूत शिवतेज भरलेले आहे. शिवबांच्या काळात माझे वैभव अगदी कुणाही हेवा करावे, असेच होते. आज मी भग्नवस्थेत आहे. माझे गतवैभव छिन्नविच्छन्न झालेले आहे. तरी मी अभिमानाने सांगतो की, मी इतिहासाचा महान शिलेदार आहे; तरीही मी हुताम्यांचा सम्राट आहे. माझ्या भग्नतेतच शिवबांच्या अमरत्वाचे निशाण अभिमानाने फडकत आहे. मला अभिमान वाटतो की, मला त्यांच्यामुळेच अमरत्वाचे वरदान मिळालेले आहे. जोपर्यंत मी आहे, तोपर्यंत हा धगधगता इतिहास लोकांना आठवणारच.

आजा माझ्या अंगावर विराजमान शूर तानाजीच्या पुतळा म्हणजे माझा गौरवच ! आज माझ्या या भूमीवर अनेक प्रेमवीर यायला लागले आहेत. पण मला फार वाईट या गोष्टीचे वाटते की, ज्या भूमीवर ज्वलंत इतिहास घडला, त्या भूमीवर प्रेमचाळे नकोत; तर तानाजींच्या स्मृतीला अभिवादन केले पाहिजे; त्यांच्या चरणी नतमस्तक झाले पाहिजे. माझी अजून एक शान म्हणजे लोकमान्य टिकांचा बंगला, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी सिंहगर्जना करणाऱ्या, लोकमान्य नेत्याचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. पण या बंगल्याचेही लॉजिंग- बोर्डिंग झालेले पाहिले, की मन विषण्ण होते.थोर व्यक्तींच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी मलिन होऊ नये, अशी मनापासून इच्छा आहे.माझ्या भूमीवरील त्या विधवा झालेल्या तोफा,ते ढासळलेले भव्य बुरुज, पाहून येणाऱ्या भारतीयांचा उर भरुन आला पाहिजे.

पुणे दरवाजा, कल्याण दरवाजा, तानाजी कडा, राजाराम महाराजांची समाधी, अशा इतिहासाची साक्ष देणाऱ्या वास्तू, या गोष्टी पाहून रोमारोमात वीरश्री संचारली पाहिजे. कारण, ही त्यागाची, शौर्याची भूमी आहे. मित्रांनो, तुम्ही तर हे एक पर्यटनस्थळच बनवून टाकले आहे. तुम्ही इथे येता, खाता-पिता, देवटाक्याचे गार पाणी पिता, गरमा-गरम भजींवर ताव मारता, पिठले-भाकरी, मडक्यातले दही खाता,तृप्त होता नि निघून जाता. पण खरे सांगा, तुम्हाला माझ्या या भूमीवर आल्यावर इतिहासाची आठवण येते ? कधी तरी तानाजींच्या समोर नतमस्तक व्हावेसे वाटते ?

आता तर माझ्या छातीवर दूरदर्शनचे प्रक्षेपण केंद्र उभारले गेले आहे. मानावर करुन त्या टॉवरकडे बघता; पण तानाजीकडा बघताना त्यांच्या साहसाबद्दल अचंबित होता का ? बाळांनो, १५ व्या शतकापासून घडणाऱ्या प्रत्येक ऐतिहासिक घटनेचा मी साक्षीदार आहे. त्यामुळे मला तुमच्यातील झालेला बदल जाणवल्यावाचून कसा राहील ? आता अजून एक आकर्षण तुम्ही मानवाने निर्माण केले आहे. तुमच्या लक्षात आलेच असेल. वनसंवर्धन करुन तयार झालेले उपवन १० ते १५ कि.मी. परिसरात झालेले हे उपवन नक्कीच आनंददायी आहे. तेव्हा निसर्गाशी जवळीक साधा. पक्षि-निरीक्षण करा, अभ्यास करा, संशोधन करा, आनंद मिळवा, विरंगुळा मिळवा आणि ताजेतवाने व्हा. पण ह्या भूमीवर घडलेला ज्वलंत इतिहास कधीही विसरु नका. ह्या वीरगाथेची अनंत पारायणे व्हायला हवीत. हे सर्व एक बुजूर्ग या नात्याने सांगितले. विचार करा. वारसा जतन करा. जय तानाजी ! जय शिवाजी !

## वर्णनात्मक

### १) हरवलेले बालपण

**मुद्दे :-** (लहानपण म्हणजे निरागसपणा- आवडते खेळ, हट्ट चांगल्याशाळेत प्रवेश- लहानपणीचे अनुभव- अभ्यासाचे ओझे - आनंदावर विरजन - शिकवणीचा विळखा असे हे रम्य बालपण की हरवलेले ?)

" लहानपण देगा देवा, मुंगीसाखरेचा रवा." संतांना लहानपण म्हणजे निरागसपणा हवा असतो. निरागसपणामुळेच सर्व म्हणत असतील- 'रम्य ते बालपण' मला तर ही गोष्ट पटतच नाही. आजकाल बालपणाला कोण म्हणेल रम्य ? जन्माला आल्या- आल्याच आपण मोठे होतो. आईचे बोटे धरुन चालणारे मूल आईचे बोट सोडते,केवळ दोन वर्षांचे वय होत नाही, तोच ते लगेच शाळेची पायरी चढते. अहो, मीदेखील दोन वर्षांचा असल्यापासून शाळेत जातोय. काय तर म्हणे, त्याला घरात खेळायला कोणी नाही. तिथे मुलांच्यात खेळेल. खरे कारण असते, आईची तेवढीच दोन तास सुटका! शाळेतील बाई आणि त्या मावशी आम्हा मुलांना सांभाळतात ना !

चांगल्या शाळेत प्रवेश मिळावा, म्हणून काय तो आटापिटा ! मुलांना येता-जाता प्रश्न विचारुन अगदी भंडावून सोडतात. मला आठवतोय तो दिवस. माझी मुलाखत होती. आई मला घेऊन गेली. मला खूप झोप येत होती.मग मी जेव्हा बाईंच्या समोर गेलो, तेव्हा काहीच उत्तर न देता बाहेर पळून आलो.मग काय, आईने एवढा त्रागा केला, की बस ! काय हो कळत होते तेव्हा ? तशीच स्थिती सगळ्याच मुलांची.

मला तर खरेच नाही वाटत, की आपण लहानपणातील रम्यपणा अनुभवलाय. माझ्या तर मते आजकाल मुलांचे बालपण हरवतच चाललेय. खेळायचे असते, मनसोक्त हुंदडायचे असते ; पण तो गृहपाठ आमचा हा आनंद हिरावून घेतो. एवढ्याशा वयात केवढा तो अभ्यास ? केवढे मोठे ते दप्तराचे ओझे ? स्पर्धा तर जन्मापासून सुरु. आई- बाबांना वाटते, माझ या सोन्याने उत्तम अभिनेता व्हावे, उत्तम चित्रकार व्हावे, उत्तम वादक व्हावे, उत्तम गायक व्हावे, शिवाय अभ्यासातही एवढे हुशार व्हावे की, मीच पहिला आलो पाहिजे. आम्ही मुले म्हणजे काय यंत्र आहोत का ? जे टाकाल, ते ते बाहेर यावे. यंत्राला भावना नसतात; पण आम्हाला असतात ना !

आता बघा, सुटीत तरी आनंद उपभोगता येतो का? सुटीत आमची रवानगी कोणत्या ना कोणत्या शिबिरात. निवासी शिबिर तर फारच उत्तम. पाठांतर स्पर्धेच्या निमित्ताने अर्थहीन पाठांतर करावेच लागते. म्हणे काय, तर जिभेला वळण लागते. कसले वळण घेऊन बसलात ? वळणावळणावर आमची पिळवणुक. खेळायला जागा नाही, रोज संध्याकाळी जा मैदानावर. मैदानावर जातोयस ना मग सचिन तेंडूलकर बनूनच बाहेर ये. त्या छंदवर्गांचा तर मी धसकाच घेतलाय. आवड-निवड काही असते की नाही ? जरा इयत्ता वाढली, की बाहरेची शिकवणी. शाळा संपली, की शिवकणी, शाळेआधी शिकवणी. सारा दिवस नुसती फरपटच. कधी कधी टीव्ही पहावासा वाटला, की 'अभ्यास कर' म्हणून हुकूम.

आता तुम्ही सांगा, ह्या बालपणाला रम्य म्हणाल की हरवलेपण?

## कल्पनात्मक निबंध

### १) मला देव भेटला तर .....

**मुद्दे :** (असे होईल का ? - झाले तर .... आमच्यावरील बंधने- वर मागणे - मोठे खेळ, मोठे अंगण - लहानपणीचा आनंद परत - अनाचारी, अत्याचारी लोकांना घडा रमलेल्या कल्पनाविश्वात देव भेटला तर - सगळे काही शक्य.)

मला देव भेटला तर... खरंच, कल्पना खूप छान आहे. कोणत्याही गोष्टीतील यश, कोणतेही मागणे आपण मागतो, ते देवाकडेच ना ? देव ! बापरे केवढा तेजस्वी. त्याच्याकडे बधून डोळेच दिपले. देव म्हणला, " बोल, काय हवंय तुला ? तुला माझी आठवण आली म्हणजे नक्कीच तुला काहीतरी हवं असणार हवं असणार ना ? तुम्हा माणसांना जेव्हा सगळं छान असत, तेव्हा देव नाही आठवत."

" देवा, आम्ही मुलं म्हणजे तुझ्या घरची फुलं ना ? मग आमच्यावर वडीलधारी मंडळी अन्याय का करतात ? आम्हाला खूप खेळायचं असतं; खूप बागडायचं असतं. पण ह्या मोठया माणसांनी आमच्यावर खूपच बंधनं घातली आहेत. साधं उदाहरण घ्या. पाऊस ! त्या पावसात मस्त भिजायचं असतं. पण आई ओररडते, पावसात भिजलास, तर आजारी पडशील. तू सांग ना आईला. ती झाडं, पाखरं, बेडूक प्राणी सगळे भिजतात पावसात; मग ते पडतात का आजारी? मग आम्ही भिजलो ना, तरी आम्ही आजारी पडणार नाही, असा वर दे. आम्हाला खेळायला मुळीच अंगण नाही. केवढी रे छोटी-छोटी घरं ! आमची घरं खूप मोठी कर नि समोर मोठं अंगण.

" तसंच, ती शाळा आनंददायी बनव. दप्तरांचं ओझं नको की परीक्षेची भीती नको. गणित तर शाळेतून हद्दपारच कर. ती इतिहासातली सनावळ आणि भूगोलातली भरमसाठ माहिती, विज्ञानातील संज्ञा, सूत्रं, व्याख्या सगळ्या गायब करून टाक. आमच्या शेजारी वाडीत राहणारी मुलं ना खूप गरीब आहेत.बिचारी इतकी लहान असूनही काम करतात. शाळेत शिकायला वेळही नसतो त्यांना आणि पुस्तकांचा खर्चही परवडत नाही त्यांना. एवढे कष्ट करतात ना, तरी त्यांना पिझ्झा, पाव-भाजी, आइस्क्रीम, काहीसुद्धा खायल मिळत नाही. तेव्हा देवा, अशी गरीब-श्रीमंत विषमता का ? लहानपण हरवत आहे. ते आम्हाला आनंदाने घालवता येईल, असा वर दे.

" काही लोक अनाचारी आहेत. ते लाचलुचपत करतात, खोटेपणा करतात आणि दुसऱ्यांना फसवून त्यांची पिवळणुक करतात. त्यांना चांगली अद्दल घडव आणि त्यांना यापुढे देशसेवा करण्याची बुद्धी दे. खूप लोक अज्ञानी आहेत. त्यामुळे ते अंधश्रद्धाळू आहेत. भोंदू लोक तुझ्या नावावर त्यांना फसवतात; लबाडी करतात.त्यांनादेखील चांगली बुद्धी दे आणि या अंधश्रद्धेला भोवऱ्यातून बाहेर काढ.

" आमच्या शेजारच्या देवळात सारखा लाउडस्पीकर लावलेला असतो. भजनाच्या आवाजाने डोकं दुखतं आमचं. अभ्यास होत नाही. तेव्हा तुझ्या त्या भक्तांना आवर घातलास, तर ध्वनिप्रदूषण टळेल. देवा, ज्या- ज्या वाईट गोष्टी आहेत ना, त्या सगळयांवर जादूची कांडी फिरव नि सगळीकडे कसं छान छान होईल. पण अरे हो, कल्पनाविलासात रमून काय उपयोग ? हे सारे केव्हा शक्य होईल ? 'मला देव भेटला तर !'

## सरावासाठी काही निबंध :-

**१) माझे आजोबा :-**

(मुद्दे : आजी, आजोबांचे जिव्हाळ्याचे नाते-आजोबांचे नातवंडांवरील प्रेम- दुधापेक्षा दुधाच्या सायीला जपणे-आजोबांचे वर्णन- वेशभूषा- राहणी - स्वभाव - आजोबांच्या संदर्भातील एखादी अविस्मरणीय घटना)

**२) शेतकऱ्यांचे आत्मवृत्त :-**

(मुद्दे : मी एक शेतकरी -जन्म - बालपण ५ परिस्थिती - शिक्षण - कष्ट- उत्पन्न - निसर्गावर अवलंबून - शेतीत नवीन प्रयोग- परिस्थिती सुधारणे- उत्पन्नात वाढ - मुले शिक्षित - समाज आणि सरकारकडून अपेक्षा.)

**३) माझे आवडते शिक्षक :-**

(मुद्दे : शिक्षकांचे नाव - विषय- शिक्षक आवडण्याची कारणे - त्यांचे गुण, स्वभाव- विद्यार्थ्यांना मदत करण्याची वृत्ती - शिकवण्याची हातोटी - त्यांच्याबद्दल प्रेम व आदराची भावना - त्यांचे आपल्या जीवनातील स्थान.)

**४) आई संपावर गेली तर !**

(मुद्दे हा विचार मनात केव्हा व कसा आला ? - घरात उडणारा गोंधळ -शाळेत जायला उशीर - अपूर्ण गृहपाठ-घरातील कामांमुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष - शाळेतून आल्यावर जेवण तयार नसणे - घराचे घरपण नाहीसे होणे- घरातील प्रत्येकाने वैतागणे - आईने संपावर न जाणे चांगले)

**५) छंद माझा वेगळा :-**

(मुद्दे छंद म्हणजे काय ? छंदाची आवश्यकता - विविधता छंद-छंद कसा निर्माण झाला ? छंद कसा जोपासला ? - छंदामुळे झालेले फायदे- छंदापासून मिळणारा आनंद विरंगुळा)

**६) झाडाचे आत्मवृत्त :-**

(मुद्दे जन्म - जंगलात उगवणे - छोटे रोप असतानाचे जीवन - हवा, ऊन, पाउस यांचा सहवास- मोठ्या झाडात रुपांतर - पक्षी, फळे, फुले यांच्यामुळे वैभव - आता माणसे वृक्ष तोडतात - काय वाटते ? मानवाला संदेश)

**७) पृथ्वी बोलू लागली तर ..!**

(मुद्दे : पृथ्वीचा जन्म - मानवाला उपयोग - माणसांची स्वार्थी, संकुचित वृत्ती- त्यामुळे पृथ्वीला वाटवारे दुःख - पृथ्वीचा मानवाला उपदेश - माणसाकडून अपेक्षा- मानवाचा पश्चात्ताप)

********************